# महावितरण
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## जळगाव परिमंडळ

## जाहिरात क्र. ०१ / २००९

***विद्युत वितरण क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या जळगाव परिमंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कार्यालयातील खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील वेतनगट ३ व ४ मधील रिक्तपदे सरळ सेवा भरतीद्वारे भरण्याकरिता सदृढ कार्यक्षम आणि पात्र अशा इच्छुक उमेदवारांकडून खालील पदासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.***

| अनु. क्र | पदाचे नाव | अ.जा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ यंत्रचालक | १३ | १९ | ०९ | ०३ | १२ | ०८ | ०३ | ०८ | ७५ | १५० |
| २ | कनिष्ठ तंत्रज्ञ | २८ | १९ | ०९ | ०४ | १० | ०७ | ०४ | - | ९७ | १७८ |

**टीप :** १) शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२००९ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.)

२) अपंग प्रवर्गासाठी ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्यापेक्षा कमी नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र. ३६०३५/३/२००४ ईएसटीटी(आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.इएसटी-००४/सीआर-८३९२/ऊर्जा-२ दि.२३/०६/२००८ अनुसार कनिष्ठ यंत्रचालक पदाकरिता अंध, कर्णबधीर, एक पाय बाधित, एक हात बाधित आणि कनिष्ठ तंत्रज्ञ पदाकरिता अंध व कर्णबधीर उमेदवार पात्र आहेत. अशा पात्र उमेदवारामधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि. ०७/०६/२००६ अनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अशा माजी सैनिकांनीच अर्ज सादर करावेत अन्यथा त्यांचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

४) शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल.

५) तदर्थ मंडळ अथवा महावितरण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीकरिता १०% पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. ज्या उमेदवारांनी तदर्थ मंडळ अथवा महावितरण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे अशा उमेदवारांचा या राखीव पदांकरिता विचार करण्यात येईल.

६)	महिला, माजी सैनिक व शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी यांचेसाठी आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने या आरक्षणांतर्गत निवड झालेले पात्र उमेदवार हे त्या त्या पदाच्या अनुशेष निहाय आरक्षणाखाली उदा. अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. व खुल्या प्रवर्गातील राखीव जागांवर दर्शविण्यात येतील.

## वेतनश्रेणी व एकूण अंदाजे पगार

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकूण अंदाजे पगार |
|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | ९०२०-२२०-१०१२०-२९५-१३०७०-३२५-२२४९५ | रु.१३७०७/- |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | ८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५ | रु.१२११७/- |

**दिनांक २१/१२/२००९ रोजी शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्हता |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीकडून देण्यात येणारे शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय पाठयक्रम पूर्ण झाल्यानंतर वरील संस्थेकडून देण्यात येणारे वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र. |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | |

**दिनांक २१/१२/२००९ रोजी आवश्यक अनुभव**

| अ.क्र. | पदाचे नाव | अनुभव |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील १ वर्षाचा अनुभव |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | अनुभवाची आवश्यकता नाही |

**दिनांक २१/१२/२००९ रोजी वयोमर्यादा**

दिनांक २१/१२/२००९ रोजी वयोमर्यादा किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल वय ३० वर्षे असावे.

**टीप :** १) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.
२) अपंग उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा १० वर्षांनी शिथिलक्षम राहील.
३) शिकाऊ उमेदवारीसाठी प्रशिक्षण कालावधी इतकी कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.
४) महावितरण कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.
५) माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

**सर्वसाधारण अटी :-**

१)	जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही. जाहिरातीतील पदे ही सन २००९ व २०१० करीता असल्यामुळे रिक्त पदांची उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार नेमणुका केल्या जातील.

२)	जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा.

३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग याना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२००९ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

४) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले "जाती वैधता प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक आहे. तथापि अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ज्या उमेदवाराकडे वैधता प्रमाणपत्र नसेल त्यांना शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००३/ प्रक्र.९१/मावक-५, दि.२८/०१/२००४ व क्र. सीबीसी-१०/२००३/प्रक्र.९१/मावक-५, दि.०६/०२/२००४ नुसार ३ महिन्यांच्या आत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. मात्र संबंधित उमेदवाराने ३ महिन्याच्या आत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी सदर उमेदवाराची जबाबदारी राहील. विहित ३ महिन्यांच्या आत उमेदवाराने जाती वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा कोणतीही नोटीस न देता समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) शासनाच्या आदेशानुसार अनुसूचित जमातीचे ज्या उमेदवारांना **"जाती वैधता प्रमाणपत्र"** शिवाय अर्ज केला असेल आणि त्यांची निवड झाल्यास, शासन निर्णय क्र. एसटीपी-१०९९/फा.क्र.१४/का-१०, दि. १६/०८/२००८ आणि उर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. इएसटी-२००७/प्र.क्र.२१/उर्जा-२, दि. १६/०८/२००७ प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून जाती वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नेमणूक देण्यात येणार नाही.

६) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

७) शासकीय / निमशासकीय / महामंडळ तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत अर्ज करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या / संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.**

८) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## अर्ज करण्याची पध्दत :

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज Maharashtra Knowledged Corporation Limitated (MKCL) च्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (ALC-Authorised Learning Centre) वर उपलब्ध होईल. या अधिकृत ALC ची माहिती http//www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार नमुना अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करु शकतात. त्याचप्रमाणे नमुना अर्ज MKCL च्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत, त्यासाठी उमेदवारांना रु. १०/- फॉर्म फी देणे आवश्यक आहे.

२) सदर परिक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित अधिकृत ALC वर दिनांक ०१/१२/२००९ पासून उपलब्ध राहतील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख २१/१२/२००९ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंतच राहील. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत संबंधित केंद्रावर दाखल झालेले अर्ज भरून घेतले जातील. उमेदवारांचे MKCL च्या संबंधीत अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फत भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

३) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोखाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी आणि सदरचा अर्ज MKCL च्या ALC मध्ये जमा करावा.

४) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेची रूपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र व बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती MKCL च्या संबंधीत ALC वर दिनांक ०४/०१/२०१० पासून उपलब्ध राहील. तसेच ही माहिती कंपनीच्या संकेत स्थळावर (Website) वर उपलब्ध राहील.

५) उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परीक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदर सेवाशुल्क हे रोख स्वरूपातच भरणे आवश्यक आहे व ते “ना परतावा” राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. (परिपूर्ण अर्जासोबत परीक्षाचे सेवाशुल्क रोखीने स्वीकारण्याची सोय MKCL च्या अधिकृत ALC केंद्रावर करण्यात आलेली आहे. अर्ज परिपूर्ण असल्यासच रक्कम स्विकारली जाईल व त्याबाबतची पोहच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा (summary sheet) सदर अधिकृत केंद्राकडून दिला जाईल. उमेदवाराने सदर प्रत प्राप्त करुन घ्यावी.) अपंग आणि माजी सैनिक उमेदवारांकरिता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | खुल्या प्रवर्गातील उमेदवार | मागासवर्गीय उमेदवार |
|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | रु. ४००/- | रु. २००/- |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | रु. ३००/- | रु. १५०/- |

६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची साक्षांकित केलेली छायांकित प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

७) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबतीत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्या. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल.

८) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

## निवड पध्दती :

१) सर्व पदाकरीता लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्ट रविवार दिनांक २४/०१/२०१० रोजी परिमंडळांतर्गत कोणत्याही जिल्ह्यांच्या ठिकाणी घेण्यात येईल. लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्टच्या प्रवेश पत्रावर परीक्षा केंद्राचा तपशील देण्यात येईल.

**सकाळ सत्र : कनिष्ठ यंत्रचालक**
**दुपार सत्र : कनिष्ठ तंत्रज्ञ**

२) **उमेदवारांना लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्टकरिता स्वखर्चाने यावे लागेल. याकरिता कोणत्याही प्रकारची प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही.**

३) अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्ट वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) असेल. सदर परीक्षा ही पदांसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, सामान्यज्ञान व पदासाठी आवश्यक असणाऱ्या ज्ञानावर आधारित राहील.

४) पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्ट मधील गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या व / किंवा समान गुण धारण करणाऱ्या त्या त्या संवर्ग/प्रवर्गाच्या उमेदवारामध्ये ते धारण करीत असलेली उच्च/ विशेष शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेता मौखिक परिक्षेसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल. अशी यादी कंपनीच्या संकेत स्थळावर (Website) प्रसिध्द केली जाईल. त्याचप्रमाणे सदरची यादी MKCL च्या ALC केंद्रावर उपलब्ध असेल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही. मौखिक परीक्षेचे पत्र ज्या केंद्रावर उमेदवाराने अर्ज सादर केला आहे त्या केंद्रावरच मिळेल.

५) लेखी टेक्नीकल कॉम्पीटेन्सी टेस्ट मधील गुणवत्ता आणि वैयक्तिक मुलाखतीतील गुणवत्ता एकत्र करुन पदांकरिता पदनिहाय निवडसूची तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची कंपनीच्या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) निवडसुची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रपणे मिळविलेले गुण समान असतील त्यामधील म.रा.वि.मंडळाचे/महावितरण कंपनीचे ॲप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. दोन किंवा अधिक बहिस्थ उमेदवारांचे त्याचप्रमाणे दोन किंवा अधिक प्रशिक्षणार्थीचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील ज्येष्ठता क्रम ठरविण्यात येईल.

**<u>इतर अटी :</u>**

१) जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही ‘किमान’ अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

२) अर्ज करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (Domicile) असला पाहिजे.

३) निवड झालेले उमेदवार कंपनीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांना मुळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इत्यादी कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.

४) भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवारांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

५) जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६) भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) मागासवर्गीयांनी खुल्या प्रवर्गाअंतर्गत अर्ज केला असल्यास तो नमुद केलेला विकल्प बदलता येणार नाही. संबंधित मागासवर्गीयांस सर्व बाबी खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून समजण्यात येईल.

८) निवड केलेल्या उमेदवारास परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयाच्या ठिकाणी रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार नियुक्त करण्यात येईल, याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

९) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

१०) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशत:बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

११) **निवडीच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चरित्र गैरवर्तणूकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**

१२) निवड समितीने तयार केलेली निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवड सूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१३) अर्जाचा नमुना www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. इच्छुक उमेदवार नमुना अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करु शकतात. त्याचप्रमाणे नमुना अर्ज MKCL च्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत, त्यासाठी उमेदवारांना रु. १०/- फॉर्म फी देणे आवश्यक आहे. हा अर्ज स्विकारण्याच्या तारखेच्या अंतिम दिवसापर्यंत उपलब्ध होईल. उमेदवारांनी अर्ज डाऊन लोड करुन भरावा.

********